महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, शिवाजीनगर, पुणे 411 005.

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE DIVISIONAL BOARD, PUNE - 411005

DIVISIONAL CHAIRMAN
25536722 (OFF)

DIVISIONAL SECRETARY
25536781/82/83 / 25536712(OFF)

FAX- 020/25536761
E-MAIL - sscboardpune@gmail.com
Website- www.sscboardpune.in

ज.क्र पुविमं / प्रात्यक्षिक / पी.2 / 685
दिनांक : 03 / 02 / 2025.

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हा :– पुणे, अहिल्यानगर व सोलापूर.

**विषय :– उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) परीक्षा फेब्रुवारी–मार्च 2025 प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी व अंतर्गत परीक्षा व आऊट ऑफ टर्न परीक्षेच्या वेळापत्रकाबाबत...**

**संदर्भ : 1. कमांक–रां.मं / परीक्षा–2 / 301, दिनांक–22 / 01 / 2025 चे परिपत्रक.**
**2. कमांक–रां.मं / परीक्षा–6 / 4505, दिनांक–21 / 11 / 2024 चे परिपत्रक.**

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी–मार्च, 2025 प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी व अंतर्गत परीक्षेचे गुण ऑनलाईनद्वारे खालील कालावधीत भरावयाचे आहेत. त्यानुसार सदरची परीक्षा संपुष्टात येताच परीक्षेचे साहित्य आपल्याशी संलग्न असलेल्या संकलन / वितरण केंद्रावर खालील दिनांकास मंडळ प्रतिनिधींमार्फत स्विकारण्यात येणार आहे.

| अ.क. | परीक्षेच्या कार्यवाहीचा तपशील | ऑनलाईन गुण भरण्याचा कालावधी | साहित्य संकलनाचा दिनांक |
|---|---|---|---|
| 1. | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.12 वी)प्रात्यक्षिक, श्रेणी व तोंडी परीक्षा | दि. 24 / 01 / 2025 ते दि.18 / 02 / 2025 | सोमवार दि.24 फेब्रुवारी, 2025<br>ठिकाण : संबंधित संकलन केंद्र<br>वेळ : स. 11:00 ते दु. 04:00 |
| 2. | NSQF अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा, माहिती तंत्रज्ञान व सामान्य ज्ञान विषयांची परीक्षा | | |

तसेच एखादा विद्यार्थी नियमित प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी व अंतर्गत परीक्षा देवू शकला नाही त्याची OUT OF TURN पध्दतीने खालीलप्रमाणे 03 दिवसांमध्ये परीक्षा आयोजित करण्यात आली आहे. त्यानुसार विद्यार्थ्याची प्रात्यक्षिक परीक्षा प्रति विषयास रु.100 / – शुल्क चलनाने भरुनच परीक्षा घेण्यात यावी. सदर परीक्षेचे साहित्य नमूद दिनांकास समक्ष विभागीय मंडळ कार्यालयात जमा करावयाचे आहे.

| अ. क. | परीक्षेच्या कार्यवाहीचा तपशील | परीक्षा कालावधी | साहित्य संकलनाचा दिनांक |
|---|---|---|---|
| 1 | OUT OF TURN परीक्षा | दि. 12, 15 मार्च, 2025 व दि. 17 मार्च, 2025 रोजी | सोमवार दि. 24 मार्च, 2025<br>ठिकाण :विभागीय मंडळ कार्यालय |

तरी वरीलप्रमाणे परीक्षा संबंधित कामकाजाची नोंद घ्यावी व संदर्भीय 1 च्या पत्राचे वाचन होवून पुढील कार्यवाही करावी.

**सोबत : संदर्भीय 1 चे पत्र**

(औदुंबर उकिरडे)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ, पुणे.05

REDMI NOTE 11 PRO+ 5G
03/02/2025 17:21

Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स.न.८३२ ए, फा.प्लॉ.नं.१७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 । EPABX -25705000 ।
Email : secretary.stateboard@gmail.com

परीक्षा प्राधान्य/महत्वाचे

क्र.रा.मं./परीक्षा-२/३०1
पुणे-४११ ००४
दिनांक-२२/०१/२०२५

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
सर्व विभागीय मंडळे.

विषय - उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा फेब्रु.-मार्च २०२५ चे प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी व अंतर्गत (Practical & Internal Exam.) मूल्यमापनाचे ऑनलाईन पध्दतीने गुण भरणेबाबत.....

संदर्भ - १. या कार्यालयाचे पत्र क्र. रा.मं./परीक्षा-२/१२० दि.०९/०१/२०२५
२. या कार्यालयाचे पत्र क्र. रा.मं./परीक्षा-७/१२१ दि.०९/०१/२०२५

उपरोक्त संदर्भिय पत्रांच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२वी) चे प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी व अंतर्गत (Practical & Internal Exam.) मूल्यमापनाचे ऑनलाईन पध्दतीने गुण भरणेबाबतच्या सूचना संदर्भिय पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

१) फेब्रु.-मार्च २०२५ मधील इयत्ता १२ वी प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षेचे ऑनलाईन पदध्तीने गुण भरण्यासाठी "I.A.MARK" ही लिंक मंडळाच्या www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर दिनांक २४/०१/२०२५ ते दिनांक १८/०२/२०२५ या कालावधीमध्ये विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पाठविण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. सदर गुण नोंदविताना त्याची पूर्णत: गोपनीयता राहील याची सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी दक्षता घ्यावी.

२) उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांचे बैठक क्रमांकनिहाय ऑनलाईन पध्दतीने नोंदविलेल्या गुणांची Final Printout घेवून त्यावर अंतर्गत व बहिस्थ परीक्षकांची स्वाक्षरी (आवश्यक त्या विषयाबाबत) व तोंडी, अंतर्गत मूल्यमापन, श्रेणी इ. गुणतक्त्यानुसार संबंधीत विषय शिक्षकांची स्वाक्षरी घेवून सदर गुण तक्त्यावर प्राचार्य/मुख्याध्यापक यांनी कनिष्ठ महाविद्यालय/उच्च माध्यमिक शाळेचा शिक्का उमटवून स्वाक्षरी करावयाची आहे. व सदरचे गुणतक्ते प्रचलित पध्दतीप्रमाणे सिलबंद पाकीटामध्ये, पाकीटावर उच्च माध्यमिक शाळा /कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव व सांकेतिक क्रमांक लिहून गुणतक्ते व साहित्य सोमवार, दि.२४/०२/२०२५ रोजी विभागीय मंडळाकडे जमा करावयाचे आहे. सदर गुणतक्त्यांची एक प्रत उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात माहितीस्तव जतन करणे आवश्यक आहे.

३) उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे नाव, आईचे नाव व इतर दुरुस्त्या दि.१८/०२/२०२५ पर्यंत संदर्भिय पत्र क्र.२ मधील सूचना क्र.५ नुसार विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने पाठवावयाच्या आहेत. यानंतर सदर दुरुस्त्यांसाठी ऑनलाईन लिंक उपलब्ध राहणार नाही.

४) अतिविलंब शुल्काच्या मुदतीमध्ये भरलेल्या व या Online System मध्ये ज्या विद्यार्थ्यांचे बैठक क्रमांक उपलब्ध झाले नाहीत अथवा विद्यार्थ्यांनी ऐनवेळी विषय बदल केला आहे. अशा सर्व विद्यार्थ्यांचे गुण प्रचलित पध्दतीने निर्धारित तारखेस विभागीय मंडळामध्ये जमा करावयाचे आहेत.

उपरोक्त प्रमाणे सदर सूचना व ONLINE गुणांसंदर्भातील सर्व बाबी आपल्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांच्या निदर्शनास आणून देण्यात याव्यात.

(देविदास कुलाळ)
सचिव
राज्य मंडळ, पुणे-४

प्रत माहितीस्तव-
व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्य मंडळ, पुणे